**बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासासाठी लाभार्थींची पात्रता निश्चित करण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**

**गृहनिर्माण विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: विविचा-२०१६/प्र.क्र. २६१/गृनिप**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक: ०९ मार्च, २०२१

**वाचा:**

१) शासन निर्णय क्रमांक : विविचा २००७/ प्र.क्र. ५१ (भाग-१)/गृनिप, दि. ३०.०३.२०१६,

२) शासन निर्णय क्र. विविचा २०१६/ प्र.क्र. २६१ /गृनिप, दि. २८.०६.२०१७.

३) शासन निर्णय क्र. विविचा २०१६/ प्र.क्र. २६१ /गृनिप, दि. २४.०४.२०१८.

**प्रस्तावना**

बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासासाठी लाभार्थींची पात्रता निश्चित करण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना उपरोक्त संदर्भ क्रमांक २ व ३ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. संदर्भ क्र. ३ येथील दि. २४.०४.२०१८ रोजीच्या शासन निर्णयामधील परिच्छेद क्र. १ व २ मध्ये भाडेदारीच्या अनधिकृत हस्तांतरण प्रकरणांच्या नियमितीकरणाबाबत कालावधी नमूद करण्यात आलेला आहे. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांच्या अध्यक्षतेखालील समितीने त्यांच्या दि. १२.०२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या अहवालामध्ये भाडेदारीच्या अनधिकृत हस्तांतरण प्रकरणांमध्ये पात्रतेची दि. २८.०६.२०१७ च्या ऐवजी दि. ०१.०१.२०२१ अशी करण्याबाबत शिफारस केली होती. मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीने त्यांच्या दि. २५.०२.२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये सदर प्रस्तावास तत्वत: मान्यता दिली होती. मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय समितीच्या दि. ०८.०३.२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीने घेतलेला उपरोक्त निर्णय कायम केला आहे व त्यानुसार आवश्यक शासन निर्णय निर्गमित करण्याचे निर्देश दिले आहेत.

**शासन निर्णय:-**

बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासासाठी लाभार्थींची पात्रता निश्चित करण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना संदर्भ क्रमांक ३ येथील शासन निर्णय दि. २४.०४.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयातील पहिल्या परिच्छेदात नमूद निर्णय क्रमांक २ अ मध्ये **"दि. १२.१२.१९९४ ते दि. २८.०६.२०१७ या कालावधीत"** च्या ऐवजी **"दि. १२.१२.१९९४ ते दि. ०१.०१.२०२१ या कालावधीत"** अशी सुधारणा करण्यात येत आहे.

२. त्याचप्रमाणे उपरोक्त शासन निर्णय दिनांक २४.०४.२०१८ मधील परिच्छेद २ मध्ये नमूद निर्णय क्रमांक ३ येथील **"भाडेदारीचे हस्तांतरण (विक्री) केलेल्या दि. २८.०६.२०१७ पर्यंतच्या प्रलंबित प्रकरणांमध्ये"** च्या ऐवजी **"भाडेदारीचे हस्तांतरण (विक्री) केलेल्या दि. ०१.०१.२०२१ पर्यंतच्या प्रलंबित प्रकरणांमध्ये "** अशी सुधारणा करण्यात येत आहे.

३. संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णय दि. २४.०४.२०१८ सोबतच्या विवरणपत्र "ब" मधील अनुक्रमांक १ येथील तरतूदीमध्ये **"दि. ०१.०१.२०१७ ते २८.०६.२०१७"** च्या ऐवजी **"दि. ०१.०१.२०१७ ते दि. ०१.०१.२०२१"** अशी सुधारणा करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे अनुक्रमांक ३ येथील तरतूदीमध्ये **"दि. ०१.०१.२०१७ ते दि. २८.०६.२०१७"** च्या ऐवजी **"दि. ०१.०१.२०१७ ते दि.०१.०१.२०२१ "** अशी सुधारणा करण्यात येत आहे

३. अन्य मार्गदर्शक सुचना / तरतूदींमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०३०९१४३११९७९०९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Manohar
Ramchandra Parkar

Digitally signed by Manohar Ramchandra Parkar
Date: 2021.03.09 14:40:13 +05'30'

(म. रा. पारकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपालांचे सचिव , राजभवन, मुंबई (पत्राने),
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२.
४) मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२.
५) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
६) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
७) मा. सर्व विधानसभा व विधानपरिषद सदस्य,
८) मा.मुख्य सचिव यांचे सहसचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
९) महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परिक्षा)
१०) महालेखापाल, महाराष्ट्र -२, नागपूर (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परिक्षा)
११) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/ सचिव
१२) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई,
१३) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, वांद्रे, मुंबई,
१४) जिल्हाधिकारी, मुंबई शहर, मुंबई -३२.
१५) मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, वांद्रे, मुंबई,
१६) मुख्य अधिकारी, गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, कोकण/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपुर,
१७) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई,
१८) सर्व उप सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१९) सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई,
२०) निवडनस्ती, कार्यासन-गृनिप, संग्रहार्थ.